नियमित फौजदारी खटला क्र.४००/२०२१
निशाणी क्र.३७

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ याचा जबाब**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – पो.हे.कॉ. शिवाजी नामदेव माने,

वय – ४१ वर्षे, व्यवसाय– नोकरी,

नेमणूक – नगर तालुका पोलीस स्टेशन, जि. अहिल्यानगर.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. एस. के. साबळे यांचे मार्फत सुरुः–**

१. दि.१९.१०.२०२० रोजी मी सोनई पोलीस ठाणे येथे पो.ना. या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी माझ्याकडे चांदा बीटचे कामकाज होते. त्यादिवशी गु.र.नं. ५३०/२०२० भा.द.वी. कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ या गुन्ह्याचा तपास लेखी आदेशाद्वारे माझ्याकडे दिला होता. आता मला तो आदेश दाखविण्यात आला. त्यावर ठाणे अंमलदार यांची सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३८** देण्यात येते. तपास आदेशासोबत मला फिर्याद, दैनिक अहवाल, मेडीकल यादी आणि एफ.आय.आर. प्राप्त झाले.

२. त्यानंतर मी चांदा येथील फिर्यादीच्या घरासमोर असलेल्या घटनास्थळावर जावून दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा केला. घटनास्थळ फिर्यादीने दाखवले. तसेच फिर्यादीने ज्या लाकडी काठीने त्याला मारहाण झाली ती काठी दाखवली. ती काठी दोन पंचांसमक्ष जप्त करून सिल केली. आता मला निशाणी क्र. १९ वरील तो घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी व दोन पचांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. जप्त काठी दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला आर्टीकल – A वरील लाकडी काठी दाखवण्यात आली. ती तिच काठी आहे. त्यावर असलेल्या सिलवर माझी व पंचांची सही आहे.

सदरची काठी पोलीस ठाण्यात मुद्देमाल कारकून यांच्याकडे पावती करून जमा केली. ती पावती दोषारोपपत्रासोबत जोडलेली आहे. आता मला ती पावती दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशाणी क्र. ३९** देण्यात येते.

३. त्यानंतर साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपीला नोटीस दिली. फिर्यादीचे जखमीचे प्रमाणपत्र मिळणेकरीता ग्रामीण रुग्नालय सोनई येथे पत्र देवून ते प्रमाणपत्र हस्तगत केले. आता मला ते पत्र दाखवण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ४०** देण्यात येते. तपासामध्ये निष्पन्न झाले की, आरोपीने फिर्यादी व त्याचा मुलगा विष्णू यांना गचांडी धरून लाकडी काठीने मारहाण केली व मी विहिरीत मारेल किंवा स्वतःला जाळून घेईल अशी धमकी दिली. त्यामुळे आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. आरोपीला पाहिल्यास मी ओळखू शकतो. ती आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास आरोपींतर्फे ॲड. बी. एस. गरड यांच्यामार्फत सुरु.**

४. मी सन २०१५ ते २०२१ या कालावधीमध्ये सोनई पोलीस ठाणे येथे कार्यरत होतो. हे मला सांगता येणार नाही की, दिनांक १६.१०.२०२० रोजी सुनिता दहातोंडे यांना जमीन विकली त्यातून सदरचा वाद झाला होता. घटनास्थळाचा गट क्रमांक मला आठवत नाही. मला घटनास्थळाच्या चतुःसिमा आठवत नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादीच्या घराच्या आसपास ब–याच वस्त्या आहेत.

५. हे मला सांगता येणार नाही की, फिर्यादीने फिर्यादमध्ये "अनिकेतने मला मिठी मारून धरून ठेवले होते” हे सांगितले होते किंवा नाही. मी फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये चालू असलेल्या दिवाणी वादाबाबत तोंडी चौकशी केली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने फिर्यादीला कधीही मारहाण केली नाही, शिविगाळ करून विहिरीमध्ये उडी टाकण्याची धमकी दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने लाकडी काठीने फिर्यादीच्या डाव्या कमरेवर मारहाण केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, घटनेचा तपास केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

**स्वाक्षरीत/–**
**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–०९/०३/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२),नेवासा